जा.क्रं.कोजिप/शिक्षण/प्राथ/वशि-१९/ 830 /२०२३
शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद कोल्हापूर
दिनांक :- 12/०५/२०२३

**वाचले :-**

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा (सेवाप्रवेश) नियम १९६७ च्या नियम ६(८)
२. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक :- जिपब-४८२०/प्र.क्र.२९०/आस्था-१४ दिनांक ०७/०४/२०२१
३. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन पत्र. जिपब/२०२२/ प्र. क्र. २९ (भाग-२)/आस्था-१४ दिनांक २४/०२/२०२३
४. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडून जिल्हातंर्गत बदली झालेल्या शिक्षकांची प्राप्त यादी दिनांक , दिनांक २१/०३/२०२३
५. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन पत्र. जिपब/२०२२/ प्र. क्र. २९ (भाग-२)/आस्था-१४ दिनांक ०४/०५/२०२३

# आदेश

महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा (सेवाप्रवेश) नियम १९६७ च्या नियम ६(८) नुसार जिल्हा परिषद कोल्हापूर अधिनस्त कार्यरत असलेल्या एकूण १२०९ शिक्षकांची उपरोक्त संदर्भ क्रमांक ०२ महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक :- जिपब-४८२०/प्र.क्र.२९०/आस्था-१४ दिनांक ०७/०४/२०२१ मधील तरतुदीनुसार संगणकीय ऑनलाईन प्रणालीद्वारे सन २०२२-२३ मध्ये जिल्हातंर्गत शिक्षकाची बदली प्रक्रीया पूर्ण झालेली आहे.

संदर्भ क्रमांक -०३ अन्वये जिल्हातंर्गत बदली झालेल्या शिक्षकांना दिनांक ०१/०५/२०२३ ते दिनांक १५/०५/२०२३ पर्यत कार्यमुक्तीचे प्रशासकीय आदेश निर्गमित करावेत व कोणत्याही परिस्थितीत दिनांक १६/०५/२०२३ ते दिनांक ३१/०५/२०२३ या कालावधीत अशा शिक्षकांना प्रत्यक्ष कार्यमुक्त करण्याबाबतची कार्यवाही करावी असे निर्देश आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर, प्राप्त अधिकारांचा वापर करून सोबत दिलेल्या कार्यमुकती आदेशाचे परिशिष्ठात नमूद केलेल्या अ. क्र. ०१ ते ११९५ शिक्षकांना त्यांनी पसंतीक्रमामध्ये नोंदविलेल्या ठिकाणी जिल्हातंर्गत बदलीने नियुक्ती देवून कार्यमुक्ती आदेशाचे परिशिष्ठातील रकाना क्रमांक ०६ मध्ये नमूद केलेल्या शाळेमधून रकाना क्रमांक ०७ मध्ये नमूद केलेल्या शाळेत उपस्थित होण्यासाठी संदर्भ क्रमांक ०३ व ०५ नुसार या आदेशान्वये दिनांक १५/०५/२०२३ रोजी कार्यमुक्त करण्यात येत आहे. सदर आदेशाची अंमलबजावणी संबधीत गटशिक्षणाधिकारी यांनी तात्काळ करून केले कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**अटी व शर्ती**

१. सोबत सादर केलेल्या कार्यमुक्ती आदेशाचे परिशिष्ठातील बदली झालेल्या अ. क्र. ०१ ते ११९५ शिक्षकांना बदली झालेल्या सद्या कार्यरत असलेल्या शाळेतून कार्यमुक्त करण्यात यावे व त्यांना प्राप्त झालेल्या संगणकीय बदली आदेशामध्ये नमूद पदस्थापना मिळालेल्या शाळेत दिनांक १६/०५/२०२३ ते दिनांक ३१/०५/२०२३ या मुदतीत उपस्थित राहण्याचे आहे. उपस्थित न झाल्यास असे शिक्षक नियमानुसार शिस्तभंग विषयक कार्यवाहीस पात्र राहतील.

२. कोल्हापूर जिल्हा परिषदेने ज्या अटी व शर्ती ठरविलेल्या आहेत व पुढे वेळोवेळी ठरविल्या जातील त्या संबधितांवर बंधनकारक राहतील .

३. सदरच्या बदलीस पदग्रहण अवधी व प्रवास भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

४. बदली आदेशातील शिक्षकांनी या आदेशासोबत बदली पोर्टलवरून प्राप्त झालेला संगणकीय बदली आदेश जोडून पदस्थापनेच्या ठिकाणी उपस्थित होणे बंधनकारक राहील.

५. संबधीत शिक्षकांनी केलेल्या विनंतीप्रमाणे व त्यासाठी सादर केलली आवश्यक कागदपत्रे सत्य आहेत असे समजून सदर बदली करण्यात आलेली आहे. यामध्ये काही तफावत आढळलेस संदर्भ क्रमांक ५.३ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

६. बदलीने नियुक्ती दिलेल्या शाळेवर हजर न झाल्यास व परस्पर अंशत: बदल करण्यासाठी विनंती अर्ज या कार्यालयास सादर केल्यास व प्रशासनावर राजकीय व इतर दबाव आणल्यास तसेच खोटी व दिशाभूल करणारी वस्तुस्थिती जाणीवपूर्वक लपवून ठेवणारी माहिती सादर केल्यास सबंधितां विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद व जिल्हा सेवा (शिस्त व अपिल ) नियम १९६७ मधील नियम ३ नुसार शिस्तभंग विषयक कारवाई करणेत येईल.

७. संबंधित शिक्षकांनी दिनांक १६/०५/२०२३ ते दि. ३१ /०५/२०२३ पर्यत पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांचे विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद व जिल्हा सेवा (शिस्त व अपिल ) नियम १९६७ मधील नियम ३ अन्वये शिस्तभग विषयक कारवाई करणेत येईल.

८. जिल्हातंर्गत बदली पोर्टलवर भरलेली माहिती चुकीची आढळून आलेस संदर्भ क्रमांक ०२ मधील ५.१०.५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

संजयसिंह चव्हाण
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद कोल्हापूर

**प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

१. गटविकास अधिकारी पंचायत समिती सर्व
२. गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती पंचायत समिती (सर्व )

संजयसिंह चव्हाण
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद कोल्हापूर